गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
गुरूवार, दि. ९ जानेवारी २०२५


## देवतळे महाविद्यालयात वाचन संवाद कार्यक्रम

**चामोर्शी** : स्थानीक कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालयात प्राचार्य डॉ. डी.जी. म्हशाखेत्री यांच्या मार्गर्शनाखाली ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत 'लेखक व विद्यार्थ्यांमधील वाचन संवाद' कार्यक्रम घेण्यात आला.

महाराष्ट्र शासन यांचे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमा अंतर्गत १ जानेवारी ते १५ जानेवारी असा वाचन पंधरवाडा आयोजन करण्याचे कळविण्यात आले होते. या वाचन पंधरवाडा मधील लेखक व विद्यार्थी यांच्या मधील वाचन संवाद हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. डॉ. भुषण आंबेकर होते तर प्रमुख मार्गदर्शक संजय कुनघाडकर, कृषक हॉयकुल चामोर्शी व प्रा. डॉ. राजेंद्र झाडे हे होते.यावेळी संजय कुनघाडकर यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व समजावून सांगितले सोबतच क्लिष्ट संकल्पना समजण्यासाठी वाचन आवश्यक आहे व वाचनाने बुध्दी समृध्द होते असे प्रतिपादित केले तर प्रा. डॉ. झाडे यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाचा व्यासंग जोपासून कौशल्य विकसित केली पाहिजे असे म्हणाले.

# दोन जहाल महिला माओवाद्यांचे आत्मसमर्पण

## शासनाने जाहिर केले होते १० लाखांचे बक्षिस : दोघींवर ५३ गुन्ह्यांची नोंद

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ८ :** चकमक, जाळपोळ अशा विविध गुन्ह्यात सहभागी असलेल्या जहाल दोन महिला नक्षल्यांनी आज ८ जानेवारी पोलिस व सीआरपीएफ समोर आत्मसमर्पण केले. शामला झुरू पुडो उर्फ लीला कंपनी क्र. १० पीपीसिएम/सेक्शन कमांडर वय ३६ वर्षे रा. गट्टेपल्ली ता. एटापल्ली, काजल मंगरू वड्डे उर्फ लिम्मी, भामरागड दलम सदस्य वय २४ वर्षे, रा. नेलगुंडा, ता. भामरागड असे आत्मसमर्पण करणाऱ्यांना महिला माओवाद्यांचे नावे आहेत. शासनाने दोघींगवर १० लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. विशेष म्हणजे शामला पुडो ही २३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या चकमकीत मारल्या गेलेल्या डिकेएसझेडसीएम रूपेश मडावी उर्फ सांबा यांची पत्नी आहे.

शामला झुरु पुडो सन २००२ मध्ये चामोर्शी दलम मध्ये सदस्य पदावर भरती होवून काम केले. २००२ मध्ये प्लाटुन क्र. ३ मध्ये बदली होऊन सन २००७ पर्यंत काम केले.२००७ मध्ये कंपनी क्र. ४ मध्ये बदली होऊन सन २००८ पर्यंत काम केले. २००८ मध्ये पीपीसीएम पदावर पदोन्नती होऊन सेक्शन कमांडर म्हणून कंपनी क्र. ४ मध्ये सन २०१० पर्यंत काम केले. २०१० मध्ये कंपनी क्र. १० मध्ये बदली होऊन सेक्शन कमांडर या पदावर राहुन आजपावेतो काम केले. तिच्यावर एकूण ४५ गुन्हे दाखल असून त्यामध्ये २१ चकमक, ६ जाळपोळ व अन्य १८ गुन्ह्यात समावेश होता. शामलावर शासनाने ८ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.



काजल मंगरु वड्डे ही जानेवारी २०१८ मध्ये भामरागड दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन आजपावेतो कार्यरत. तिचा ४ चकमक, १ जाळपोळ, ३ इतर असे एकूण ८ गुन्हे दाखल होते. शासनाने काजलवर २ लाखांचे बक्षीस जाहिर केले होते.

गडचिरोली पोलीस दलाने अतिशय प्रभावीपणे माओवादविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच शासनाने माओवाद्यांना आत्मसमर्पणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याने, सन्मानाने जीवन जगण्यासाठी सन २०२२ ते आतापर्यंत एकुण ४६ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. सन-२०२५ च्या पहिल्याच आठवडयात १३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले, ज्यामध्ये १ जानेवारी २०२५ रोजी मुख्यमंत्री यांचे समोर ११ वरिष्ठ कॅडरच्या माओवाद्यांचाही समावेश होता.

सदर माओवाद्याचे आत्मसमर्पण घडवून मुख्यप्रवाहात आणण्याबाबतची कारवाई पोलिस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) नागपूरचे संदिप पाटील, गडचिरोली परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे पोलिस उपमहानिरीक्षक अजय कुमार शर्मा, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, ११३ बटा. सीआरपीएफचे कमांडंट जसवीर सिंग, यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

### आतापर्यंत ६९३ माओवाद्यांचे आत्मसमर्पण

शासनाने सन २००५ पासून जाहिर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी आजपर्यंत पोलीसां समोर आत्मसमर्पण केलेले आहे. त्याचबरोबर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवून आणल्यामुळे आजपर्यंत एकुण ६९३ माओवाद्यांनी गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केले आहे.

### आत्मसमर्पण करून सन्मानाचे जीवन जगावे

विकासकामांना आडकाठी निर्माण करणाऱ्या माओवाद्यांवर पोलीस दल सक्षमपणे कारवाई करण्यास तत्पर असुन, जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास ईच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल, तसेच त्यांनी हिंसेचा त्याग करुन शांततेचा मार्ग स्विकारावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केले.

## अवैध मुरूम वाहतुक करणारा ट्रक पकडला

### आलापत्ती-लगाम मार्गावर कारवाई

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ८ :** रस्ता बांधकामाकरिता अवैधरित्या मुरुमाचे उत्खनन करुन वाहतूक करीत असल्या प्रकरणी अहेरी तालुका प्रशासकीय पथकाने हायवा ट्रक जप्त करण्याची कार्यवाही मंगळवार ७ जानेवारी दुपारच्या सुमारास पार पाडण्यात आली. तालुका महसूल कार्यालयाच्या या धडक कारवाईमुळे अवैधरित्या मुरुम उत्खनन, वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

सविस्तर वृत्त असे की, सिरोंचा - आलापल्ली या ३५३ राष्ट्रीय महा माग अंतर्गत येत असलेल्या आलापल्ली- लगाम मार्गाचे काम सुरु आहे. या रस्ता बांधकामाकरिता मुरुम वाहतूक केली जात आहे. मंगळवारी दुपारी एमएच ३६ एए-८४९९ क्रमांकाचा हायवा ट्रकने या मार्गावर मुरुम वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. अहेरी



तालुका कार्यालयाच्या पथकाने सदर ट्रक थांबवून चालक शिवप्रसाद साहू याचेकडे मुरुम वाहतूक तसेच उत्खननाचा परवाना मागितला असता संबंधित चालकाने परवाना दाखविला. मात्र सदर परवाना बेकायदेशीर असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. अवैध मुरुम वाहतूक प्रकरणी मुरुमाने भरलेला हायवा ट्रक तहसिल कार्यालयात जमा करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या हायवा ट्रक स्वामी समर्थ इंजिनअर्स लिमीटेड, पुणे या कंपनीचे असल्याची माहिती आहे.

## टसर रेशीमला लोकप्रिय बनवणे आवश्यक: डॉ. चौधरी

### आरमोरी येथे टसर रेशम कृषी मेळावा

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ८ :** आगामी वर्षांत टसर रेशीम शेतीला प्रोत्साहन देणे आणि रेशीम उत्पादनक्षमता वाढवणे हे संशोधन आणि विकासाचे मुख्य लक्ष असून टसर रेशीमला त्याच्या चमकदार आणि अद्वितीय गुणवत्तेसह लोकप्रिय बनवणे आवश्यक असल्याचे मत रांची येथील केंद्रीय रेशम बोर्ड-केन्द्रीय टसर अनुसंधान व प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ. एन. बी. चौधरी यांनी व्यक्त केले.

टसर उद्योगाला गती प्रदान करण्यासाठी, केंद्रीय रेशीम बोर्ड-केंद्रीय टसर अनुसंधान व प्रशिक्षण संस्थान रांची आणि महाराष्ट्र राज्य रेशम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आरमोरी, येथे टसर रेशम कृषि मेळाव्याचे आज ८ जानेवारी रोजी आयोजन



करण्यात आले होते. यावेळी डॉ. एन.बी. चौधरी मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाला रेशीम विभागाचे उपसंचालक डॉ. महेंद्र धावले, सहायक संचालक हेमंत लाडगांवकर, जिल्हा नियोजन अधिकारी श्रीराम पाचखेडे, जिल्हा रेशीम अधिकारी सी.आर. वासनिक उपस्थित होते.

डॉ. एन.बी. चौधरी यांनी पुढे सांगितले की, टसर रेशम शेतीमध्ये ग्रामीण रोजगार निर्माण करण्याची मोठ्या प्रमाणात क्षमता आहे. यासाठी केंद्रीय रेशम बोर्ड आणि राज्य रेशम विभागाचा आरमोरी, गडचिरोली, महाराष्ट्र आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रांमध्ये टसरच्या उत्पादन वाढीत महत्वपूर्ण योगदान देत आहे. रांची येथील संस्थान टसर रेशमाच्या संशोधन आणि विकासासाठी समर्पित एकमेव संस्था असल्याचे त्यांनी सांगितले

निसर्गाने पानांपासून रेशम तयार करण्याची अद्भुत कला टसर रेशम कीटकानला प्रदान केली आहे. टसर रेशीम आपल्या समृद्ध बनावट आणि नैसर्गिक, गडद सोनेरी रंगासाठी मूल्यवान आहे. रेशीम उद्योग नागरिकांना आर्थिक उत्पन्नासाठी फायदेशीर असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळण्याचे आवाहन डॉ. चौधरी यांनी केले

कार्यक्रमाची संचालन सी.आर. वासनिक यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल कुमार ढोले यांनी केले. मेळाव्याला कृषि अधिकारी नीलेश गेदाम, रेशीम कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी तसेच रेशीम उत्पादक शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली आदिवासी विद्यार्थ्यांची तोंडभरून स्तुती

### राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच विविध उपक्रमांचे सादरीकरणः अख्या महाराष्ट्रात प्रगत समाजाचे वेधले लक्ष

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ८ :** आदिवासी विकास विभागाचे राज्यस्तरीय क्रीडा संमेलन पोलीस लाईन टाकळी येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर ३ ते ५ जानेवारी या कालावधीत उत्साहात पार पडले. दऱ्या खोऱ्यात, दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी खेळाडूंमध्ये उपजत क्रीडा गुण व कौशल्य असल्यामुळे अनेक खेळाडूंनी चमकदार कामगिरी बजावून राज्यस्तरावर आपली छाप पाडली. सोबतच या राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदाच खेळासह नागपूर विभागातील शासकीय आश्रम शाळांमध्ये राबविल्या जात असलेले शैक्षणिक उपक्रम ब्रायटर माईंड, मेमरी इन्हान्समेंट, बोलका वर्ग या उपक्रमाचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. यामध्ये गडचिरोली



जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचाही समावेश होता. या उपक्रमाद्वारे उपस्थितांना चकित करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपस्थित मंत्री महोदय व मान्यवरांनी तोंड भरून स्तुती केली.

मैदानावर आदिवासी खेळाडूंने केलेला थरार, मल्लखांब कौशल्याच्या सादरीकरणावर मिळालेल्या टाळ्यांचा प्रतिसाद तर दुसरीकडे आदिवासी विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य व सर्वांगीण विकासासाठी शासकीय आश्रम शाळेतील शिक्षणामध्ये होत असलेल्या दिशादर्शक बदलाची आलेली प्रचिती यामुळे हे राज्यस्तरीय क्रीडा संमेलन आगळे वेगळे ठरले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, अर्थ,नियोजन, विधी व न्याय राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, सचिव विजय वाघमारे, आयुक्त नयना गुंडे यांनी हे उपक्रम राबवित असल्याबाबत अपर आयुक्त रविंद्र ठाकरे यांच्या कार्याची प्रशंशा केली.

### ब्रायटर माईंडचे बिनचूक सादरीकरण

नागपूर विभागातील वेगवेगळ्या प्रकल्पातील ब्रायटर माईंड मध्ये कीर्ती हलामी, राशी पोटावी, रवीना मरकाम, मोहित गावळ, आरती मडावी, ऋषिकेश दळांजे, कांचन गायकवाड, रितू मसराम, सुप्रिया परचाके, जीविका नरोटे, होमेश्वरी मरस्कोल्हे, विद्या कुमरे, अंजली इरपाचे, स्वराज उईके, नंदिनी नन्नावरे, चेतना चनाप यांनी डोळ्याला पट्टी बांधून रंग ओळखणे, पुस्तक वाचणे, मोबाईल वरील फोटो ओळखणे, व्यक्ती ओळखणे, डब्यात ठेवलेल्या बॉलच्या आवाजावरून रंग ओळखणे, पझल्स (चित्र जोडणे) यांचे बिनचूक सादरीकरण केले.

## शेतकऱ्यांना मिळणार आधुनिक शेतीसह तंत्रज्ञानाचे धडे

### भामरागड येथे कृषी विभागाकडून पहिल्यांदाच प्रशिक्षण

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ८ :** राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत विविध विषयांचे प्रशिक्षण दरवर्षी पुणे किंवा इतर मोठ्या शहरांमध्ये आयोजित केली जातात. त्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तिकडे जावे लागते. परंतु यावेळी प्रथमच भामरागडसारख्या दुर्गम भागात अशा प्रकारचे तीन दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. मंगळवारी या प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले. आधुनिक पद्धतीचे तंत्रज्ञान व त्यामधील भाजीपाला लागवड याविषयी शास्त्रीय पद्धतीने तज्ज्ञ व्यक्तींकडून मिळणाऱ्या या माहितीचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रिती हिरळकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ पुणे, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे, कृषी विभाग गडचिरोली आणि कृषी विज्ञान केंद्र सोनापूर गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या तीन दिवसीय निवासी 'शेडनेट हाऊस व लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण' कार्यक्रमाचे उद्घाटन तहसील कार्यालयात झाले. यावेळी स्मार्ट विभागीय नोडल अधिकारी प्रज्ञा गोळभाटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रीती हिरळकर, सहकार विकास महामंडळाचे वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप, भामरागडचे तहसीलदार किशोर बागडे, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्रज्ञ डॉ.किशोर झाडे, स्मार्टच्या अर्चना कोचर, तालुका कृषी अधिकारी कुणाल राऊत इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

भविष्यात या भागातील शेतमालाला मार्केटिंग मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन हेमंत जगताप यांनी तर आभार कुणाल राऊत यांनी मानले.

## खर्च कमी करण्यासाठी माती परीक्षण करा

### शेतकऱ्यांना मार्गदर्शनः वनखेडा येथे जागतिक मृदा दिन साजरा

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ८ :** जागतिक मृदा दिनाचे औचित्य साधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय आरमोरीमार्फत आदिवासी बहुल वनखेडा येथे जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला तालुका कृषी अधिकारी नीलेश गेडाम यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मानवी जीवन जगण्यासाठी मातीचे महत्त्व तसेच विविध पिके घेत असताना जमिनीची सुपीकता व जिवंतपणा कसे महत्त्वाचे आहे याविषयी मार्गदर्शन केले. सध्या



शेतात असलेले तूर पीक हरभरा व भाजीपाला पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन कसे करावे याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले.

कृषी अधिकारी युगेश रणदिवे यांनी शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. कृषी पर्यवेक्षक वसंत शेंडे यांनी योजनांची माहिती दिली. सर्व ग्रामस्थांच्या वतीने माहिती गावातील प्रतिष्ठित शेतकरी शामराव उसेंडी यांनी जागतिक मृदा दिनी आपले विचार व्यक्त करताना १०० टक्के परीक्षण करण्यासाठी गावकऱ्यांच्या वतीने हमी दिली. कार्यक्रमासाठी कृषी पर्यवेक्षक प्रियंका आखाडे, कृषी सहायक नितीन कुंभारे, कृषी सेवक पराग सहारे, स्मिता शंभरकर, विश्रांती वाढई, प्रमोद धोंडने यांनी सहकार्य केले.

## व्यावहारीक ज्ञानासाठी बाल आनंद मेळावा महत्वपूर्ण

### सामाजिक कार्यकर्ते अरुण कुंभलवार यांचे प्रतिपादन



**तालुका प्रतिनिधी**

**देसाईगंज दि. ८ :** शिक्षणासोबतच मुलांना व्यावहारीक ज्ञानाची देखिल गरज आहे. दर्जेदार शिक्षणांसोबतच विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी घडविण्याचे काम होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी घडवून आणलेला आनंद मेळावा सर्वांसाठी महत्त्वपूर्व असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते अरूण कुंभलवार यांनी केले.

देसाईगंज तालुक्यातील कोंढाळा येथील विद्या निकेतन शाळेत विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित बाल आनंद मेळाव्यात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जयाणंद बुराडे, नितेश पाटील, मुख्याध्यापक केशव देशमुख, मधन हर्षे, रीना कनाके, स्वाती ढोंगे, हर्षद कांबळी, मनोज तरवटकर, अशोक निबुरकर, दिलीप पारधी, आशिष बुल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना कुंभलवार म्हणाले की, आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळत आहे. मुलींनी व्यवसायाची मांडणी, हिशोब, संवादकौशल्य यासाठी हा उपक्रम महत्वपूर्ण ठरते. व्यावहिरीक ज्ञानाशिवाय जीवन जगण्याला गती येत नाही. त्यामुळे या माध्यमातून व्यावहारीक ज्ञान घेण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होते. करीता शाळांत अशा आनंद मेळाव्याचे आयोजन करणे गरजेचे असल्याचे सांगीतले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थीत होते.

# सामुहिक विवाह सोहळ्यात २२ जणांनी बांधली 'रेशीमगाठ'

### मुस्लिम समाजाचा पुढाकारः पाच जिल्ह्यासह कनार्कट, आंध्रप्रदेशातील जोडप्यांचा समावेश

**विशेष प्रतिनिधी**

**देसाईगं दि. ८ :** अतिदुर्गम, अतिसंवेदनशील जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज शहरात मुस्लिम समाजाच्या वतीने आज, बुधवार ८ जानेवारी रोजी सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात एकुण पाच जिल्ह्यासह कर्नाटक तसेच आंध्र प्रदेशातील एकुण २२ जोडपी विवाहबद्ध झालीत.

देसाईगंज येथील तमाम मुस्लिम जमाअतच्या वतीने मागील २०११ पासुन सामुहिक विवाह सोहळ्याची परंपरा कायम राखण्यात आली असून समाजातील गोरगरीब मुला-मुलिंचे वाढत्या खर्चाला बगल देत वेळेची व पैशाची बचत होऊन या निमित्ताने सामाजिक एकोपा जोपासल्या जावा हा उद्देश ठेऊन मागील १४ वर्षांपासून सामुहिक विवाह सोहळा पार पाडण्यात येत आहे. शहराच्या मदिना मस्जिद



प्रांगणात हाजी बशीर अहेमद कुरेशी यांच्या मार्गदर्शनात मुस्लिम समाजाचा सामुहिक विवाह सोहळा आयोजीत करण्यात आला होता. यात नागपुर, चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या पाच जिल्ह्यासह कर्नाटक व आंध्र प्रदेशातील एकुण २२ जोड्यांनी सहभाग नोंदवला.

या सामुहिक विवाह सोहळ्याला पाच जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती. स्थानिक आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य तपासणी पथक तैनात करण्यात आले होते. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील विवाहबद्ध जोडप्यांना समाजाच्या वतीने संसारोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. मुस्लिम समाजाची लोक सर्वस्वी छोट्या मोठ्या व्यवसायावर अवलंबून असुन अनेकांची परिस्थिती हातावर आणुन पानावर खानारांपैकी असल्याने उपवर मुला-मुलींचे लग्न करू शकत नाहीत. समाजातील लोकांची आर्थिक स्थितीमुळे आभाळ होऊ नये तसेच अनावश्यक खर्च टाळल्या जावा व वेळेची व पैशाची बचत व्हावी हा हेतू ठेऊन सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्याची निव टाकण्यात आली असल्याची माहिती या सोहळ्याचे प्रमुख तथा मार्गदर्शक बशीर अहेमद कुरेशी यांनी दिली. यावेळी मुस्लिम समाजातील अनेक गणमान्य प्रामुख्याने उपस्थित होते. विवाह सोहळा मुस्लिम समाजाच्या रितीरीवाजानुसार पार पाडण्यात आला.

सामुहिक विवाह सोहळ्याचे औचित्य साधून आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रामदास मसराम यांचा आयोजन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. स्थानिक नगर प्रशासनाच्या वतीने साफ-सफाई करण्यात आली तर पुलिस विभागाच्या वतिने तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संघटनेचे सचिव फैज खान, हाजी निसार अहमद, मजीद खान, हाजी शरीफ खान, हाजी राशीदुल हक, जावेद कुरेशी, हाजी रियाज खान, मकसुद खान, राजीक खान, बब्लु भाई, देसाईगंज येथील सर्व मस्जिद कमिटीच्या पदाधिकाऱ्यांसह मुस्लिम समाजाच्या युवकांनी सहकार्य केले. देसाईगंज येथीलच हाजी अब्दुल रऊफ खान यांच्या मार्गदर्शनात डॉ. गौरव सहारे, डॉ.जर्रीन सद्दाम बैग, डॉ. सोहेल सामी, डॉ.सोहेल खान, डॉ.सुमैया पटेल यांनी सामूहिक विवाह सोहोळ्यात सहभागी झालेल्या सर्व पाहूण्यांची निःशुल्क आरोग्य तपासणी केली. कार्यक्रमाचे संचालन कैसर जमाल शेख, प्रस्तावित व आभार सामुहिक विवाह सोहळा संघटनेचे अध्यक्ष हाजी बशीर अहमद पटेल यांनी मानले.

### आतापर्यंत ३४३ जोडपे विवाहबध्द

देसाईगंज येथील तमाम मुस्लिम जमाअतच्या वतीने २०११ ला पहिला मुस्लिम समाजाचा सामुहिक विवाह सोहळा पार पाडण्यात आला. २०११ पासुन ते २०२५ पर्यंत ३४३ जोडपी सामुहिक विवाह सोहोळ्यात विवाहबद्ध झाली. यावेळी मदीना मस्जिदचे इमाम मो. नसरुद्दीन, जामा मस्जिदचे मो.जहीर आलम, मोहम्मदिया बरकातिया मस्जिद के इमाम कारी अश्फाक रजा, मौलाना कफील अहमद नुरी, गैसीया हनीफीया मदरशाचे हाफिज मो. इरफान रजा, जामा मस्जिदचे अध्यक्ष हाजी आरिफ पटेल, हाजी खलील खान, पूर्व नगरसेवक सैयद आबीद आली आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सामूहिक विवाह सोहळा पार पाडण्यात आला.

महावितरण

## जाहीर निवेदन

33/11 के.व्ही. पोर्ला उपकेंद्रातून निघणारी 11 के. व्ही. साखरा, (गावठाण) 11 के. व्ही. पोर्ला (गावठाण) व 11 के. व्ही. गोगाव गावठाण (Feeder Charging Notice) वाहिनीचे काम सुधारित वितरण क्षेत्र योजने (RDSS) अंतर्गत करण्यात आले असुन सदर वाहिनी हि दिनांक 09.01.2025 किंवा त्यानंतर केव्हाही विद्युत भारीत करण्यात येईल. सदर तिन्ही वाहिनी 33/11 के. व्ही. पोर्ला उपकेंद्रापासून पोर्ला, साखरा, वसा, नगरी, मोहझरी, काटली, काटलीचड्डू, गोगाव, अडपल्ली, महादवाडी, कुऱ्हाडी, चुरचूरा, चुरचुरामाल व नवरगाव इत्यादी गावांच्या शिवारातून जाते.

तरी सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, वरील वीज वाहिनीखाली तणस, धान्य इ. चे ढिगारे वाढवून ठेऊ नये. तसेच वरील वीज वाहिनीखाली घरे, गोठा अथवा इतर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये. तसेच जनावरे खांबाला किंवा स्टेला बांधु नये. असे केल्यास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे कोणत्याही प्रकारची वित्त किंवा जिवीतहानी झाल्यास त्यास महावितरण जबाबदार राहणार नाही. तरी वरील माहितीची सर्व नागरिकांनी नोंद घेऊन योग्य ती खबरदारी घ्यावी व महावितरण कंपनीस सहकार्य करावे.

**कार्यकारी अभियंता**
**संवसु विभाग, म.रा.वि.वि.कं.मर्या गडचिरोली.**

PNINO-MAHAMAR 2010585
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

## गडचिरोलीहून हैद्राबादला बससेवा सुरू करावी

**गडचिरोली :** गडचिरोली येथून हैद्राबादला आंतरराज्य बससेवा सुरू करावी, अशी मागणी माजी जि.प. अध्यक्ष व राष्ट्रवादी (अजित पवार गट) सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष समय्या पसुला यांनी ७ जानेवारीला केली. याबाबत पसुला यांनी जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांना निवेदन दिले.

यात गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावरील सिरोंचा तालुक्यातून हजारो प्रवासी रोज हजारो लोक रोजगार, व्यवसाय व इतर कामासाठी ये-जा करतात, त्यांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे गडचिरोलीहून तेलंगणा राज्यातील वरंगल, करीमनगर मंचेरियल, खंबम या जिल्ह्यांना ये-जा करण्यासाठी बससेवा सुरू करावी, अशी मागणी केली आहे. यातून एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढेलच, पण नागरिकांचीही गैरसोय देर होईल, असे पसुला यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात त्यांनी खासदार डॉ. नामदेव किरसान, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आगारप्रमुख फाल्गुन राखाडे यांना निवेदन दिले आहे.

# गाव समजून घेण्यासाठी रासेयो शिबिराची भूमिका महत्वाची

### आमदार रामदास मसराम : टेमली येथे रासेयो शिबिराचे उद्घाटन

**तालुका प्रतिनिधी**
**कोरची दि. ८ :** ग्रामीण भागातील जनतेला अनेक समस्यांना तोंड देत जीवन जगावे लागत आहे. या समस्या सोडविण्यासाठी त्या आधी समजून घेणे गरजेचे आहे आणि जोपर्यंत प्रत्यक्ष जनतेत आपण मिसळणार नाही तोपर्यंत त्या समस्या समजून घेता येत नाहीत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्यक्ष समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन आमदार रामदास मसराम यांनी केले.



वनश्री कला व विज्ञान महाविद्यालय कोरचीच्यावतीने तालुक्यातील टेमली येथे आयोजित रासेयो शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी इंदिरा शिक्षण संस्था आरमोरीचे अध्यक्ष बाबासाहेब भातकुलकर होते. विशेष अतिथी म्हणून माजी कृषी अधिकारी श्याम धाईत, प्रमुख अतिथी समाजसेवक आशिष अग्रवाल, प्राचार्य डॉ. जयदेव देशमुख, सरपंच निकाबाई थाट, मुख्याध्यापक कैलास नुरुटी, उपसरपंच धनिराम हिडामी, देशीरबाई घाटघुमर, बेदराम थाट, ग्रामसेवक डी. एस. भोयर, जित. ेंद्र सहारे, नामदेवराव मेश्राम, नरेश सोनकुकरा, मदन करसी, रंजित बागडेहरिया, बरगटकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. मसराम म्हणाले की, निरोगी जीवन हिच खरी संपत्ती असून त्यासाठी पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध होणे अतिशय आवश्यक आहे. अशुद्ध पाणी प्यायल्याने ग्रामीण भागातील जनतेला अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कोरची तालुक्यात कोणत्याही मोठ्या नदी, तलाव व धरणे नसल्याने पावसाचे बहुतांश पाणी वाहून जाते. ते अडवून जमिनीत मुरविण्यासाठी आता गावागावाने पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. या परिसरात मी शिक्षक म्हणून काम केलेले असल्यामुळे मला या क्षेत्रातील समस्यांची जाणीव आहे. जरी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार नसले तरी या समस्या सोडविण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी याप्रसंगी स्पष्ट केले.

यावेळी इंदिरा शिक्षण संस्था आरमोरी, टेमली येथील ग्रामपंचायत कार्यालय, सार्वजनिक बाल गणेश मंडळ, महानुभाव पंथ मंडळ, महिला बचत गट, पुरुष बचत गट, जि. प. मराठी प्राथमिक शाळा, वनश्री महाविद्यालय कोरची व अन्य अशा विविध संस्थांकडून उद्घाटक नवनिर्वाचित आमदार रामदास मसराम यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष

### रासोयो विद्यार्थ्यांना विकासाची संधी उपलब्ध करून देणारी योजना : भातकुलकर

रासेयो ही विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी संधी उपलब्ध करून देणारी आणि समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्त्वाची जाणीव विकसित करणारी योजना आहे. प्रारंभी शिबिरात सहभागी होण्यासाठी आढेवेढे घेणारे विद्यार्थी शिबिरातून जातांना अक्षरशः रडत असतात, याचे कारण या शिबिरादरम्यान त्यांचे गावाशी जुळलेले नातेसंबध दृढ होणे हे असते. या गावात शिक्षक म्हणून सेवा देणारे शिक्षक आज विद्यमान आमदार आहेत. या गावात ग्रामसेवक म्हणून सेवा देणारे आता संवर्ग विकास अधिकारी आहेत या दृष्टीने हे गाव भाग्यशाली आहे, असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

बाबासाहेब भातकुलकर व विशेष अतिथी श्याम धाईत यांचाही शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन महाविद्यालतर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित आशिष अग्रवाल, श्याम धाईत, धनिराम हिडामी यांनीही मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थी विकासाला सामाजिक परिमाण मिळवून देणारी योजना आहे. विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सामाजिक समरसता इत्यादी मूल्यांचा विकास व्हावा यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन या शिबिरात करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयदेव देशमुख यांनी प्रास्ताविक दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रदिप चापले यांनी तर आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. टी. चहारे यांनी मानले.

## मुरखळा येथे बालस्नेही ग्रामपंचायत



**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. ८ :** चामोर्शी तालुक्यातील मुरखळा (माल) येथील जिल्हा परिषद शाळेत मंगळवारला मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या वतीने मुलांच्या तसेच गावाच्या विकासासाठी 'बालस्नेही ग्रामपंचायत' स्थापन करण्यात आली. बालस्नेही ग्रामपंचायतमध्ये मंत्रिपद आणि ७ उपमंत्रिपद विविध मंत्रिपदांचा समावेश करण्यात आला.

यामध्ये शिक्षणमंत्री, उपशिक्षणमंत्री, बाल सुरक्षामंत्री, उप बालसुरक्षा मंत्री, क्रीडा व सांस्कृतिक मंत्री, आरोग्य व स्वच्छता मंत्री, अन्न व पोषण मंत्री, नियोजन मंत्री, माहिती व प्रसारमंत्री आणि त्यांच्या उपमंत्रिपदांचा समावेश आहे. शाळेचे मुख्याध्यापक गणेश बोईनवार, मुख्याध्यापक प्रकाश पत्रे, ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र बारसागडे, शिक्षक अशोक जूवारे, धनराज चंदनखेडे, राजू वेलादी, संजय शेट्ये, प्रकाश घोगरे, राकेश नैताम, मॅजिक बसचे तालुका समन्वयक योगिता सातपुते, भीमराव शंभरकर आदी उपस्थित होते. यामध्ये शिक्षणमंत्री म्हणून सक्षम बोबाटे, प्राची चापले, बाल संरक्षणमंत्री निधी तुंबडे, ज्ञानेश्वर गटलेवार, क्रीडा व सांस्कृतिक मंत्री कृष्णा बट्टे, गुंजन सोमनकर, आरोग्य व स्वच्छता मंत्री हितेश नैताम आदींचा समावेश आहे.

## आलापल्लीत १३ जानेवारीला महारक्तदान शिबिराचे आयोजन

**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. ८ :** आलापल्ली येथील श्रीराम मंदिरात अनंत श्री विभुषीत जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेन्द्राचार्यजी महाराज दक्षीण पिठ नाणीज धाम यांचे भक्तसेवा मंडळ अहेरी, आलापल्लीच्या वतिने सोमवार १३ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता पासून तर सायंकाळी ५ वाजता पर्यंत महारक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे.

सदर शिबीरात सिआरपिएफ बटालियन ३७ चे ईच्छुक कर्मचारी, वनविभागातील कर्मचारी, विविध सामाजिक संघटना, व्यापारी संघटना, आर्य वैश्य कोमटी समाज बांधव तथा युवक, युवतींनी रक्तदान करणार असल्याचे सांगितले असुन अहेरी तालुक्यातील स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या निरोगी व सदृढ शरीर, सक्षम असलेल्या सर्व रक्तदात्यांना जगद्गुरू श्री स्वामी नरेन्द्राचार्यजी महाराज यांचे भक्तसेवा मंडळाचे वतीने आवाहन करण्यात आले आहे. रक्तदान करण्यासाठी १३ जानेवारीला श्रीराम मंदिरात जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे.

सदर संकलन केलेल्या सर्व रक्त पिशव्या ह्या उपजिल्हा रुग्णालय अहेरी येथील ब्लड बँकेत जमा राहणार आहे. अपघातग्रस्त, डिलीव्हरी पेशंट, सिकलसेल, व अन्य गरजु रुग्णांना वेळेवर मोफत रक्त पुरवठा केला जाईल. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना वेळेवर प्रमाणात दिले जाणार आहे. रक्तदान सर्व श्रेष्ठ दान आहे.

आपण दिलेल्या रक्तदानामुळे एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचवु शकतो. त्यांना जिवन दान मिळते. त्यामुळे अहेरी, आलापल्ली, एटापल्ली, नागेपल्ली, सुभाषनगर, बोरी, आपापल्ली, मद्दीमळगु यासह अनेक गावांतील रक्तदाते रक्तदान करणार असल्याची माहिती आहे. रक्त संकलन करण्या करीता उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक डॉ. कन्ना मडावी यांचे उपस्थितीत ब्लड बँक अहेरीचे सर्व कर्मचारी सर्व साही त्या सहीत वेळेवर श्रीराम मंदिर आलापल्ली येथे उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे.

## जेजानी स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये क्रीडा दिन साजरा

**शहर प्रतिनिधी**
**देसाईगंज दि. ८ :** स्थानिक जेजानी स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये ७ ते १० जानेवारी पर्यंत चालणाऱ्या क्रिडा उत्सवाचे ७ जानेवारी रोजी उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास मुख्य पाहुणे म्हणून एस.आर.पी.एफ. चे दशरथ जांभूळकर, मारोती लांब. ेवार, शाळेच्या संस्थापक नमिता जेजानी, मुख्याध्यापिका रेहाना शेख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांनी मशाल प्रज्वलित करून केली. नंतर विद्यार्थ्यांनी केलेल्या भव्य मार्च पास्टने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. नंतर प्रमुख पाहुणे दशरथ जांभूळकर यांनी विद्यार्थ्यांना क्रिडा खेळाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचा मुख्य आकर्षक बिंदू क्रिकेटचा सामना होता. मुख्य पाहुण्यांनी पहिला चेंडू टाकून आणि फलंदाजी करून सामन्याची सुरुवात केली. संपूर्ण मैदानावर जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी दिवसभर उत्कृष्ट क्रिडा कौशल्य आणि खेळाडू वृत्तीचे प्रदर्शन केले. जेजानी स्कूल ऑफ स्कॉलर्स ही शाळा शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रिडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी नेहमीच अग्रेसर राहिली आहे.

## आंबेखारी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**तालुका प्रतिनिधी**
**कोरची दि. ७ :** तालुक्यातील आंबेखारी येथे तालुकास्तरीय शालेय बाल क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन सोहळा ६ जानवोरी रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार रामदास मसराम यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. रामदास मसराम यांनी खेळांचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विक. ासातील योगदान यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान टेमलीच्या सरपंचा निकाबाई थाट होत्या. याप्रसंगी काँग्रेस तालुका अध्यक्ष मनोज अग्रवाल, हकिमुद्दिम शेख, जिल्हा उपाध्यक्ष परसराम टिकले, दीपक हलामी, परमेश लोहंबरे, श्रावण मातलाम, शिषुला नरोटे, भारत नरोटे, सियाराम हलामी, धनिराम हिडामी, गटशिक्षणाधिकारी अमित दास, रामसूराम कार्टेंगे, भारत नुरुटी, सुदाराम सहारे, जुगेल नुरूटी, रमेश नरोटे, संतोष नरोटे, जगतराम नरोटे, रवि नंदेश्वर, कांताराम जमकातन, शिक्षक तावडे आदी उपस्थित होते. स्थानिक अधिकारी, शिक्षकवर्ग, पालक, तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. स्पर्धेत विविध प्रकारच्या खेळांचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन केले.

## पतंग उडवताना विद्युत यंत्रणापासून सुरक्षित अंतर राखा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ८ :** मकर संक्रांतीची चाहूल लागताच निळ्या आकाशात पतंगा उंच भरारी घेतांना शहरात दिसत आहे. बालकांसह ज्येष्ठ मंडळी पतंग उडवण्याची मौज लुटतात. पतंग उडवताना पतंगाचा मांजा विद्युत खांब, रोहित्रे, विद्युत वाहिन्यांच्या संपर्कात आल्याने अपघाताच्या घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे पतंग उडवताना विद्युत यंत्रणा पासून सुरक्षित अंतर राखाव, असे आवाहन महावितरणने केले आहे.

शहरी व ग्रामीण भागात विद्युत वितरणसाठी आवश्यक पायाभूत सुविधांचे जाळे पसरलेले आहे. मात्र पतंग उडवताना या यंत्रणा पासून दूर राहावे. पतंग प्रेमींनी मोकळ्या मैदानात पतंग उडवावे. विद्युत वाहिन्या, खांबावर अडकलेली पतंग वा मांजा काढण्याचा प्रयत्न करू नये. कारण विद्युत वाहिन्यांचे एकमेकांवर घर्षणाने शॉर्टसर्किट होऊन जीवित वा वित्तहानीची शक्यता असते. घराच्या गच्चीवर रोहित्रांवर चढून विद्युत तारांमध्ये अडकलेला पतंग काढण्याचा प्रयत्न टाळावा असेही मुख्य अभियंता हरीश गजबे यांनी आवाहन केले आहे.

विद्युत वाहिन्यांचे अडकलेले पतंग काढण्यासाठी दगडाला दोरा बांधून वाहिन्यांवर फेकणे चुकीचे आहे. धातू मिश्रित मांजाचा वापर टाळावा कारण धातू मिश्रित मांजा विद्युत यंत्रणेच्या संपर्कात आल्यास त्यात विद्युत प्रवा. हत होऊन विजेचा धक्का लागण्याचा धोका असतो असे ते म्हणाले. तसेच वीज वाहिन्यांच्या दोन खांबांच्या मधात वीज वाहिण्यात अडकलेले पतंग काढता येत नाही. त्यामुळे वीज पुरवठा विस्कळीत होऊन, ताराला तार भिडल्याने होल्टेज वाढू शकते आणि मोठे नुकसान होण्याची शक्यता असते. तसेच घराबाहेर सायकल किंवा मोटार सायकल घेऊन बाहेर पडणाऱ्या व्यक्तीचा पतंगीच्या मांज्यामुळे गळा चिरल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीमध्ये महा. वितरणच्या संबंधित शाखा कार्यालयाशी संपर्क साधावा; जेणेकरून तत्काळ वीजपुरवठा खंडित करून तातडीची मदत करणे सोयीचे होईल, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता गजबे यांनी केले आहे.

## जिल्हा परिषद हायस्कूल बेडगावने बांधला वनराई बंधारा

**तालुका प्रतिनिधी**
**कोरची दि. ८ :** जिल्हा परिषद हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय बेडगाव व ग्रामपंचायत कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोहगाव नाला येथे वनराई बंधारा बांधून 'पाणी अडवा पाणी जिरवा' चा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.



विद्यार्थ्यांनी २०० खाली सिमेंट बोरीत रेती भरून बंधारा मजबूत बांधल्याने पालतू तथा जंगली जाणवरांना पिण्याच्या पाण्याची सोय होईल असे मत वनपरिछेत्रधिकारी ठाकरे यांनी प्रत्येक्षात भेट देऊन केले. याच नाल्यावरून बेडगांवला पिण्याचा पाण्याचा पुरवठा होत असल्याने पाण्याची पातळी वाढेल असे सरपंच चेतन किरसाण यांनी यावेळी सांगितले.

बंधारा बांधण्यासाठी प्रचार्य एस. बी. उसेंडी, वनपरी क्षेत्रअधिकारी ठाकरे, वनरक्षक मसराम, सरपंच चेतन किरसाण, उप सरपंच देविदास गुरनुले, पंढरी कुरसुंगे, मधुकर प्रधान, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष राकेश पारडवार, दिलीप कुरसुंगे महाराज, प्रा. गणेश सोनकलंगी, मनोज बनसोड, विजय मसराम, राकेश गायकवाड, मेघशाम कोसरे, प्रा. काजल मडावी, प्रा. श्रीती भैसारे, नेहा लिमजे, वालदे, जिजा खुणे व शिला नैताम यांनी सहकार्य केले.

## पेंढरीतील शेतकऱ्यांना धान केंद्राची प्रतीक्षा

**धानोरा :** खरीप हंगामातील धान निघून महिना लोटत आला आहे. मात्र, धानोरा तालुक्यातील पेंढरी येथील शासकीय धान खरेदी केंद्र अद्यापही सुरू न झाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. परिणामी शेतकऱ्यांना हतबल होऊन खासगी व्यापाऱ्यांकडे धान विक्री करून स्वतःची आर्थिक पिळवणूक करून घ्यावी लागत आहे. पेंढरी येथे उपप्रादेशिक व्यवस्थापक धानोरा यांच्या मार्फतीने मागील वर्षापासून धान खरेदी केली जात आहे. मात्र, धानोरा येथूनही खरेदी प्रक्रिया सुरू झालेली नसल्याने अडचणीत असलेल्या पेंढरी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.

धानोरा उपप्रादेशिक व्यवस्थापक कार्यालयाद्वारे मागील वर्षीपासून पेंढरी येथे शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, खरीप हंगामातील धान निघून दीड महिन्याचा कालावधी उलटत आला असतानाही येथील धान खरेदी केंद्र बंद आहे. परिणामी या परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याचे दिसून येत आहे.

## राजे धर्मराव महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवडा

**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. ८ :** राजे धर्मराव कला व वाणिज्य महाविद्यालय आलापल्ली येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा १ ते १५ जानेवारी पर्यंत वाचन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नीरज टी. खोब्रागडे होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा.डोंगरे, प्रा. डॉ. शिंदे, प्रा. प्रतिमा सूर्यवंशी उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. नीरज खोब्रागडे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर पुस्तक वाचून आपल्या ज्ञानात भर पडावी व यशस्वी व्हावे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. दया मेश्राम यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. गावडे, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## देसाईगंज येथे निघाली विज्ञान दिंडी

### आदर्श इंग्लीस हायस्कूलच्या प्रतिकृतीने वेधले शहरवासीयांचे लक्ष



**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि. ८ :** शिक्षण विभाग जिल्हा परिषद,गडचिरोली वतिने 'शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान' या मुख्य विषयावर आधारित ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन ६ जानेवारी ते ९ जानेवारी या कालावधीत जीवरसायनतज्ञ डॉ. हरगोविंद खुराणा विज्ञाननगरी विनायक माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय विसोरा येथे संपन्न होणार असून त्या अनुषंगाने जागृती करण्यासाठी देसाईगंज शहरात खाजगी शाळांच्या वतिने भव्य विज्ञान दिंडी ६ जानेवारी रोजी काढण्यात आली. यावेळी विज्ञान दिंडीतील आदर्श इंग्लीस हॉयस्कुल देसाईगंज च्या क्षेपणात्र प्रतिकृतीने शहरवासीयाचे लक्ष वेधले.

नूतन शिक्षण प्रसारक मंडळ देसाईगंजचे उपाध्यक्ष जगदीश शर्मा यांनी हिरवी झेंडी दाखवून विज्ञान दिंडीची सुरुवात केली. यावेळी नूतन शिक्षण प्रसारक मंडळ देसाईगंजचे सचिव मोतिलाल कुकरेजा, उशिक्षणाधिकारी (माध्य.) अमरसिंग गेडाम, देसाईगंज पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी नरेंद्रकुमार कोकुडे, गटसमन्वयक एकनाथ पिलारे, नूतन शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष मुरलीधर दुपारे, सहसचिव ओमप्रक. ाश अग्रवाल, सदस्य अ.जाहिर अ. हमिद शेख, संतुमल डोडाणी, योगेश नाकतोडे, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य श्रीराम गहाणे, आदर्श इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.डी. शिंगाडे, उपमुख्याध्यापिका एस.पी. प्रधान, पर्यवेक्षिका डी.व्ही.चव्हाण, महात्मा गांधी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य महेश मुंडले, कुथे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मंगेश भावे, यशोदादेवी इंग्लिश मीडियम हायस्कुलचे मुख्याध्यापक पी.एम.देशपांडे, प.पू. डॉ. आंबेडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.बी.मेश्राम, प्रागतिक गर्ल्स हायस्कूलचे मुख्याध्यापक हरीद. ास पेंदाम उपस्थित होते.

विज्ञान दिंडीत स्काऊट व गाईड पथक, लेझीम पथक, महापुरुषांच्या वेशभूषेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. देसाईगंज शहरातील आदर्श इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, यशोदादेवी इंग्लिश मीडियम हायस्कुल, प.पू.डॉ. आंबेडकर विद्यालय, महात्मा गांधी विद्यालय, कुथे पाटील कनिष्ठ महाविद्यालय, प्रागतिक गर्ल्स हायस्कूल या खाजगी शाळांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस प्रशासन व बटालीयनचे उत्तम सहकार्य लाभले. यावेळी शिक्षक,शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

## मुनघाटे महाविद्यालयात मराठी बोलीभाषा ध्वनीसंकलन उपक्रमाचा शुभारंभ

### आयआयटी मद्रासचा महत्वकांक्षी उपक्रम

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. ८ :** दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वार संचालित स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयात मद्रास द्वारा मराठी बोलीभाषा ध्वनी संकलन उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या शुभारंभाचे उद्घाटन दंडकाण्य संस्थेचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कौस्तुभ शिरोडकर आणि रितेश कदम हे उपस्थित होते.



भारत सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या भाषिनी या प्रकल्पांतर्गत भारतीय संविधानात नमूद केलेल्या २२ भाषांसाठी संपूर्ण भारतातून स्थानिक बोलीभाषेचे नमुने गोळा करण्याचे कार्य आयआयटी मद्रास मधील रिसर्च लॅबव्दारे ३ ते १४ जानेवारी २०२५ पर्यंत केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून मराठी बोली भाषेच्या ध्वनि संकलनाचा कार्यक्रम श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागाद्वारे आयोजित करण्यात आली.

सातत्यपूर्ण उपक्रमशीलता जपणाऱ्या या महाविद्यालयातील मराठी विभागाने जमुना आमंत्रित करून सदर विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले. स्थानिक लोकांच्या बोलीभाषेचे नमुने कठबात या ॲपमध्ये रेकॉर्ड करून थेट आयआयटी मद्रास येथे संकलित करण्यात आले. या कार्यक्रम कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाला प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लुप्त होणाऱ्या अनेक गोष्टींचे संकलन करणे किती गरजेचे आहे हे त्यांनी सांगितले. बदलत्या काळात अनेक गोष्टी झपाट्याने बदलत आहेत, त्यामध्ये संस्कृती बरोबरच अनेक बोलींचा रास होत चाललेला आहे. बोली संवर्धन हे खऱ्या अर्थाने एक अतिशय महान कार्य असल्याचे ते ते म्हणाले. डॉ. गणेश देवी यांनी केलेल्या कार्याचा व त्यांनी मांडलेल्या विचारांचा त्यांनी याप्रसंगी मागोवा घेतला.

याप्रसंगी कौतुक शिरोडकर आणि सिद्धेश कदम यांनी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांशी सुसंवाद साधताना वेगवेगळे उपक्रम देऊन त्यामधून या भागातील लोकांच्या बोलण्यातील लय, भाषेची सुरावली, भाषेचा लहेजा, भाषेची ढब समजून घेण्याचा आणि संकलित करण्याचा प्रयत्न केला. काही विद्यार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात प्रशिक्षित करून समाजातील विविध वयोगटातील लोकांचे भाषिक नमुने गोळा केले. तर येणाऱ्या काळात २१ व्या शतकातील बोली आणि मराठी भाषा यांचे स्वरूप पुढे येणाऱ्या पिढ्यांना कळू शकेल यासाठी केवळ ही एक कार्यशाळा नसून हे एक देश कार्य असल्याचेही ते म्हणाले. याप्रसंगी मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. एस. खोपे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र आरेकर यांनी केले. संचालन व आभार प्रा. डॉ.राखी शंभरकर यांनी केले.

## विवेकानंद बुध्द विहारात मनुस्मृती दहन कार्यक्रम

**गडचिरोली :** स्थानिक प्रबुध्द बुध्द विहार विवेकानंद नगर येथे भारतीय बौध्द महासभा जिल्हा महिला शाखा, प्रबुध्द बुध्द विहार तथा रमाई महिला मंडळ विवेकानंद नगर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच महिला मुक्ती दिन अर्थात मनुस्मृती दहन दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौध्द महासभा जिल्हा महिला शाखेच्या अध्यक्षा सुरेखा बारसागडे होत्या. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून भंतेजी यशवर्धन, भारतीय बौध्द महासभेचे जिल्हाध्यक्ष तुलाराम राऊत, प्रबुध्द बुध्द विहाराचे अध्यक्ष अमर कुमार खंडारे, शिशुपाल शेंद्र, आदी उपस्थित होते.

